2021-22

# स्त्रीवाद

## (सिध्दांत आणि व्यवहार)

FEMINISM
OR
EQUALISM?



**डॉ. प्रतिभा एस. जाधव**

स्त्रीवाद (सिद्धांत आणि व्यवहार)

■ डॉ.प्रतिभा सुरेश जाधव

■ प्रथम आवृत्ती – दि. ८ मार्च २०२२

© प्रकाशक व संपादक

■ प्रकाशक

आधार पब्लिकेशन, अमरावती.

हनुमान मंदिराजवळ, पाठ्यपुस्तक मंडळा समोर,

वि.म.वि.कॉलेज मागे, अमरावती

मो. ९५९५५६०२७८

email- aadharpublication@gmail.com

■ मुखपृष्ठ संकल्पना

विलास पवार

सरिता ग्राफिक्स, अमरावती

■ अक्षरजुळवणी

सरिता ग्राफिक्स,

कठोरा रोड, अमरावती

■ Price : 400/-

**ISBN-** 978-93-91305-29-1

सुचना:- सदर अंकामध्ये प्रकाशित झालेल्या लेखास, संपादक, प्रकाशक, मालक, मुद्रक जबाबदार राहणार नाही. या अंकामध्ये प्रकाशित झालेले लेख लेखकाचे त्यांचे वैयक्तिक मत आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| 15 | स्त्रीवाद: मूळ आणि विकास' | डॉ. शीतल मारुती कोरडे | 92 |
| 16 | स्त्रीवाद आणि सामाजिक समानता | प्रा. डॉ. सौ. मंगल एकनाथ डोंगरे | 100 |
| 17 | स्वातंत्र्यपूर्व काळातील महाराष्ट्रातील स्त्रीवादी चळवळ आणि शिक्षणाचा अधिकार | श्री सचिन विजय वाघमारे | 106 |
| 18 | दोघींसाठीची पथ्ये | उषा किशन भोसले | 113 |
| 19 | स्त्री कालची आणि आजची | उषा किशन भोसले/सौ .रुपाली राहुल जाधव | 120 |
| 20 | स्त्रीवाद - संकल्पना व स्वरूप | प्रा. डॉ.अरुण उत्तम पाटील | 122 |
| 21 | मराठी स्त्रीवादी साहित्य | प्रा.आशा विश्राम पाटील | 127 |
| 22 | मराठी स्त्रीवादी साहित्य | प्रा. डॉ. सायली आचार्य | 132 |
| 23 | स्त्रीवादी कवितेचे स्वरूप | प्रा.डॉ.शोभा डहाळे | 141 |
| 24 | भारतीय इतिहासातील स्त्रिया व स्त्री जीवन : स्वरूप आणि चिकित्सा | प्रो.डॉ.शैलेश विश्वनाथ त्रिभुवन | 147 |
| 25 | जागतिकीकरणाच्या युगातील स्त्रीवाद | डॉ. वसावे अशोक रामसिंग | 157 |

# स्त्रीवाद - संकल्पना व स्वरूप

प्रा. डॉ.अरुण उत्तम पाटील
महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालय, मालेगाव कॅम्प ता. मालेगाव जि.नाशिक

---

जीवनातील वेगवेगळया विषयांच्या अनुषंगाने कलावंताला उत्कटपणे प्रतीत झालेले वेगवेगळे आशय वेगवेगळया रूपबंधामधून ज्यांच्यात साकार झालेले आहेत, असे असंख्य साहित्यकृतींचे विश्व म्हणजे साहित्याचे विश्व होय. ललित साहित्यातून अनुभव साकार होत असतात. सर्वकष पर्यावरणात घडणाऱ्या आंतरक्रियेतून अनुभव साकार होतो.साहित्य ही एक कला आहे. इथे भावानुभवाला आणि विचारालाही महत्त्वाचे स्थान आहे. साहित्यात विचाराला मज्जाव नाही उलट विचारामुळे साहित्यकृतीला घनता आणि वजन प्राप्त होते म्हणून त्याला साहित्यात जास्त महत्त्व दिले जाते. तो अनुभवावरून लादलेला वा अनुभवाला चिकटलेला नसतो, तर तो अनुभव रूप होऊन कलाकृतीत आविष्कृत झालेला असतो. साहित्यिकाच्या सौंदर्य जाणिवेने केलेली ती निर्मिती असते. साहित्यकृतीमधील अनुभवातही विचार हा मार्गदर्शक तत्त्वासारखा असतो. गतकाळाची मूल्य दृष्टीच्या प्रकाशात समीक्षा करण्याची आणि भविष्याचा वेध घेण्याची ताकद अशा प्रतिभावंत साहित्यिकात असते.

जीवन हा एक अखंड वाहता प्रवाह आहे. कलावंत आपल्या अनुभवाचे भांडे त्या प्रवाहातील पाण्यानेच भरून त्या पाण्याला भांड्याचा आकार प्राप्त होतो. पाण्याचे मूळ गुणधर्मही त्यात तसेच असतात, तसेच साहित्यातून व्यक्त होणाऱ्या अनुभवाला त्याचे स्वतःचे असे विशिष्ट रूप प्राप्त होते.त्याला त्याचे असे व्यक्तित्व प्राप्त होते, तरी त्याचे मूळ रूप जीवन हेच असते. त्याचप्रमाणे बहुसंख्य स्त्रियांच्या कथांचे विषय स्त्रीजीवनाशी निगडित असलेले दिसून येतात,किंबहुना स्त्री जीवन हेच त्याच्या केंद्रस्थानी असल्याचे दिसून येते. त्यामुळे त्यांचा दृष्टिकोन स्त्रीवादी होता

काय ? तो केंद्रस्थानी ठेवूनच त्यांनी कथांची मांडणी केली आहे काय ? याचा शोध घेण्यापूर्वी स्त्रीवाद म्हणजे काय ? स्त्रीवादी समीक्षा म्हणजे काय ? त्याचे नेमके स्वरूप कसे आहे ? याचा शोध प्रथम घ्यावा लागतो.

साहित्यिकाची एक विवक्षित जीवनदृष्टी असते. हा दृष्टिकोन त्याचे जगणे, त्याचे अनुभव आणि सांस्कृतिक पर्यावरण यांच्या परस्पर संबंधातून साकार होतो.तो दृष्टिकोन त्याच्या सांस्कृतिक व्यवहारातच घडलेला असतो. हे सर्व समजावून घेताना एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे ती ही की मानवी जीवनात एकच एक संस्कृती असत नाही. पुष्कळदा समाजात संस्कृती संघर्ष दिसून येतो, या संस्कृती संघर्षाचे चित्रण साहित्यातून दिसून येते. एकोणिसाव्या आणि विसाव्या शतकात हे प्रामुख्याने दिसून येते.

१९५० मध्ये भारताने प्रजासत्ताक राज्य पद्धतीचा स्वीकार केला. पारतंत्र्य संपून नवीन पर्वाला सुरुवात झाली. स्त्री विषयक वैचारिक जाग येऊन तदसंबंधी नवविचारांची सुरुवात व प्रगती १९ व्या शतकात झाली. विसाव्या शतकात या प्रगतीला वेग आला. तिची काही सामाजिक बंधने सैल होऊन ती सर्व क्षेत्रात प्रगती करू लागली. या विकासाच्या प्रक्रियेवर घटनात्मक समानतेने शिक्कामोर्तब केले. स्त्रियांना अधिकृत समानतेचा अधिकार मिळाला पण जुन्यातून नव्याकडे जात असता त्यात कायापालट होत असतो .ती संक्रमणावस्था महत्त्वाची असते. गतिमानता व परिवर्तनशीलता संपूर्ण समाजाचे व्यक्तिगत, कौटुंबिक, सामाजिक, सांस्कृतिक भावविश्व ढवळून काढत असते. त्याचे पडसाद जीवनात पडतात.ते अपरिहार्यपणे साहित्यातही प्रतिबिंबित होतात.बदललेले स्त्रीजीवन हे त्याचेच द्योतक आहे. घटनेने स्त्री - पुरुष समानता दिली तरी दैनंदिन वास्तव जीवनात ती समानता उरलेली दिसेलच असे म्हणता येत नाही. अनेक नवे कायदे आले तरी त्याने समाजातील प्रश्नांचे निराकरण होत नाही. जुन्या-नव्याच्या संघर्षात कधी तडजोड करीत तर कधी मोडतोड करीत स्त्रियांनी आपले आत्मभान व आत्मसन्मान, आत्मशोध यांचा शोध घेतलेला दिसून येतो.

२०व्या शतकातील उत्तरार्धात बदलणारी स्त्री व २१ व्या शतकात आपला शोध घेणारी, जीवन संघर्षातून जाणारी स्त्री व तिचे भावविश्व स्त्रियांच्या कथाविश्वात वैपुल्याने दिसून येत असल्याने स्त्रीवादाचा विचार करण्यापूर्वी ती विचार प्रणाली प्रथम स्पष्टपणे लक्षात घ्यावी लागते.कारण स्त्रीवादी विचार प्रणाली विविध स्थानात व विविध काळात वेगवेगळ्या स्वरूपात प्रकट झालेली दिसून येते.

पुरुषाला समाजरचनेत जसे एक अर्थपूर्ण स्थान आहे,तसे स्त्रीलाही प्राप्त व्हावे, यासाठी जीवनाच्या सर्व क्षेत्रात संघर्षशील राहणारी 'स्त्रीवाद' ही एक विचार प्रणाली आहे.[१] स्त्रीवाद ही केवळ एक सैद्धांतिक विचार प्रणाली नसून ती गतिशील आणि कृतीनिष्ठ स्वरूपाची आहे. आपल्या भोवतालचे जग केवळ समजावून घेणे एवढ्यापुरते तिचे उद्दिष्ट मर्यादित नसून ते जग बदलण्याचा प्रयत्न करणारी ती विचार प्रणाली आहे. [२]

स्त्रीवादी विचारसरणी प्रथम पाश्चात्य देशात उदयाला आली. त्या विचारसरणीतच तीन प्रवाह होते. पुरुषी वर्चस्व जुगारून देण्यासाठी स्त्रियांनी संघटित झाले पाहिजे. या विचारसरणीचा गट दुसऱ्या महायुद्धानंतर उदयाला आला. स्त्रियांच्या चळवळीशिवाय स्त्रीमुक्ती होणार नाही यावर त्यांचा विश्वास होता. मध्यमवर्गीय स्त्रियांना पुरुषी वर्चस्वाची सतत प्रचिती येत असल्याने त्यांना या विचारसरणीचे आकर्षण असलेले दिसून येते, तर दुसरा स्त्रीवादी विचारांचा प्रवाह जहाल भूमिका घेणारा असून निसर्गाच्या विरुद्ध जात पुरुषी वर्चस्व झुगारून देऊन मुक्तपणे राहणारा हा एक कडवा स्त्रीवादी गट आहे, तर तिसरा प्रवाह हा समाजवादी विचारांचा अंगिकार करणारा असून त्याने स्त्रियांच्या गुलामगिरीचा संबंध भांडवलशाहीशी जोडला असून त्यांच्याविरुद्ध लढा देणे. हेच त्याचे ध्येय असलेले दिसते. या तीनही विचारप्रणालीनी निर्माण झालेल्या स्त्रीवादी विचारांचा प्रसार एकाच वेळी इंग्लंड, फ्रान्स, अमेरिका इत्यादी युरोपीय देशांमध्येही झाला. आशियायी देशांप्रमाणे तो भारतातही पोहोचला. प्रत्येक देशाची परंपरा, संस्कृती, वातावरण भिन्न तसेच परिस्थिती आणि स्त्रियांचे प्रश्न स्वतंत्र त्यामुळे प्रत्येक देशपरत्वे स्त्रीवादाची मांडणी आणि कार्यपद्धती स्वतंत्रपणे आकाराला आली.

'स्व' शोधासाठी चाललेला स्त्रीचा आजचा झगडा समजून घेताना मागे जाऊन त्याचा शोध घेता स्त्रीमुक्ती चळवळीची मुळे त्यात दिसून येतात, जगभर स्त्रीवर होणाऱ्या अन्यायात साम्यस्थळे असली तरी त्यांना वेगवेगळया संदर्भात आणि संस्कृतीत मिळणारे प्रतिसाद आणि भावनांची अभिव्यक्ती यात खूप वैविध्य आढळते तसेच एकाच समाजाच्या सांस्कृतिक संदर्भात सुद्धा कालमानाप्रमाणे विविधता दिसून येते. स्त्रिया मुक्तीच्या दिशेने वाटचाल करू लागल्या तसा त्यांना कुटुंबाकडून विरोध होणे स्वाभाविक होते, तसा हा प्रश्न फार गुंतागुंतीचा आहे. त्याचा शोध घेत असता एका बाजूला तत्वज्ञानाच्या क्षेत्रात खोल शिरावे लागते.तर दुसऱ्या बाजूने भारतीय व पाश्चात्त्य मूल्य व्यवस्थेतील फरक समजावून घेणे अनिवार्य ठरते.

स्त्रीवादी चळवळ हे एका अर्थाने राजकीय आंदोलन आहे. या आंदोलनाने स्त्रीचे शोषण, अन्याय, छळ याबद्दलची जाणीव अधिक तीव्र करण्याचा तो एक संघटित होऊन स्वातंत्र्यासाठी दिलेला झगडा आहे. आजच्या राजकारणात संघर्षाशिवाय यश मिळत नाही, असे त्यांना वाटते. परंतु या स्त्रीवादाला वैयक्तिक झगड्याचीही एक बाजू आहे. हे लक्षात घ्यावे लागते. [३] या वैयक्तिक पातळीवर झगडताना स्त्रियांना भोवंडून टाकणाऱ्या हिंसक अनुभवातून न जाता, जर सहजपणे स्थित्यंतर करण्यासाठी ज्या मूल्य व्यवस्थेत हे संक्रमण शांततापूर्णरित्या झालेले आहे. ती मुल्ये महत्त्वाची ठरतात. त्यातच त्यांचे वेगळेपण आहे.

स्त्रीवादाविषयी समाजात एक चुकीचा दृष्टिकोन निर्माण झालेला दिसतो, तो म्हणजे स्त्रीवादी आंदोलने हे पुरुषी वर्चस्वाला विरोध करणारे आंदोलन आहे. ते तसे नसून सहयोगाची व सहजीवनाची मागणी करणारे ते एक आंदोलन आहे. [४] मुळात स्त्रीवाद ही संकल्पना एका विचारावर एका सत्वावर उभी राहिलेली नाही. ती बहुपेडी आहे.अनेक विचार, अनेक संकल्पना,दृष्टिकोन तत्त्वपद्धती यांचा अंतर्भाव तिच्यात झाला आहे. त्या विविध विचारांना लक्षात घेऊन असे म्हणता येते की, स्त्रीवाद हा पुरुष - विरोधी संघर्ष नसून जैविक, सामाजिक, मानसिक आर्थिक, आणि राजकीय स्तरांवर स्त्रीला जे कनिष्ठ स्थान दिले गेले आहे. ते नष्ट करून पुरुषांच्या बरोबर समानतेचे अस्तित्व तिला प्राप्त व्हावे.तिला स्वतंत्र व्यक्तित्व प्राप्त होऊन

तिची स्वतंत्र ओळख व्हावी. हा हेतू त्यामागे आहे, तसेच स्त्रीवादी सिद्धांताला केवळ तत्त्व विचाराचे अधिष्ठान नाही, वर्तमानातील स्त्रीजीवनाच्या निरीक्षणांचा त्यांना आधार आहे. स्त्रीवादात जे वैविध्य दिसते ते त्यातील विविध उद्देशांच्या पुरस्कारामुळे हे लक्षात घ्यावे लागते, असे असले तरी स्त्रीवादी सिद्धांत वस्तुनिष्ठ आहे. अनेक स्त्रीवादी सिद्धांत हे स्त्रियांच्या कृतिशील चळवळीतून उदय पावलेले आहेत. [५]

**संदर्भ ग्रंथ -**

१)डॉ. वरखेडे मंगला (संपा.) - स्त्रीवादी समीक्षा - संकल्पना व उपयोजना पृ. १

२)राजाध्यक्ष विजया (संपा.)- मराठी वांङ्.मय कोश खंड ४था समीक्षा - संज्ञा पृ. ४०७

३)रानडे प्रतिभा - स्त्री प्रश्नांची चर्चा - एकोणिसावे शतक पृ.१४

४)डॉ. देशपांडे वैशाली - स्त्रीवाद और हिंदी महिला उपन्यासकार पृ. १७

५) डॉ. मनोहर जाधव (संपा.) समीक्षेतील नव्या संकल्पना, स्वरूप प्रकाशन, आवृत्ती १ली